# Model Answer
## Set- III
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – Marathi H.L.**



**Time: 3 hrs** **Marks: 80**

**विभाग १ – गद्य**

**प्र.१ अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.**

| | |
|---|---|
| झाडावरून गळून पडणारी | पिकलेली पाने |
| पानाने गवताच्या पात्याला दिलेली उपमा | चिडखोर बिब्बा |
| नव्या गवतपात्याचा जीव खाऊन टाकणारी | गळणारी पाने |
| संजीवक स्पर्शाने गवतपात्याला जागे करणारा | वसंत ऋतू |

२) **एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) पानाचे रुपांतर जादूने गवताच्या चिमुकल्या पात्यांत झाले होते.

ब) बोलता बोलता पान पृथ्वीवर पडले आणि धरणी मातेच्या कुशीत झोपी गेले.

३) मानवी जीवनात आपणास कितीतरी विसंवाद दिसतात. वडील पिढी सतत तरुणाईकडून होणा-या चुकांचा पाढा वाचत असते; पण कधी काळी आपण तरुण होतो, आपणाकडूनही काही चुका झाल्या हे त्यांना आठवत नाही. तरुण पिढी ही बेजबाबदार आहे, असे म्हणणा-या वडील पिढीच्या विरोधात तरुण दक्ष असतात. त्यांच्या बडबडलीला कंटाळून कपाळाला आठ्या घालणारी तरुण पिढी आपल्या वार्धक्यात वडील पिढीचाच कित्ता गिरवते. सुख दुःख या केवळ माणसाच्या कल्पना आहेत. पण समरसपणे त्यांच्याकडे पाहण्याची मनुष्याची प्रवृत्ती नाही. मालक व नोकर यांच्यात सदैव द्वंद्व असते. मजूर मालकाच्या उद्दामपणाबद्दल, जुलमाबद्दल, निर्दयीपाणाबद्द्ल सतत बोलत असतात तर मालक मजुरंच्या कामचुकारपणाबद्द्ल सदैव बोलत असतात; पण दोघांच्या स्थानाची अदलाबदल केली, तर त्यांच्या स्वभावात बदल होईल का? हाच खरा प्रश्न आहे.

ब) **पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| दरवर्षी शाळेत साजरा होणारा | → | क्षिक्षक दिन |
| क्रिकेटचा कॅप्टन | → | विराट कोहली, धोनी |
| ओरिसाचे प्रसिद्ध शिल्पी | → | सुदर्शन परनायक |
| प्रसिद्ध सनईवादक | → | बिस्मीलाह खान |

२) **एका शब्दात उत्तर लिहा.**

i) आप्पा शिपाई ii) चार्जर iii) शिपाई iv) पातक

३) खरे तर कोणतेही कष्टाचे काम करणे हे श्रेष्ठ किंवा कनिष्ट नसते. त्या कामाचा दर्जा हा आपल्या प्रामाणिकपणे काम करण्यावर असतो. समाजातील प्रत्येक काम करणारा माणूस फार महत्त्वाचा असतो. रस्ता झाडणारा व

कचरा साफ करणारा, शेत पिकवणारा शेतकरी, लोहार, चांभार या सर्व कष्ट करणा-यांनी आपले काम करायला नकार दिला तर काय होईल? रस्त्यावरचा कचरा चार दिवस उचलून नेला नाही तर नाक मुठीत धरून रस्त्याने चालावे लागेल.

शेतक-यांनी शेतात धन्य पिकवले नाही तर आपण खाणार काय? चांभाराने चप्पल, बूट शिवले नाहीत तर तापलेल्या रस्त्यावरून आपण अनवाणी चालू शकू का? म्हणजेच हे श्रमजीवी, कष्टकरी लोक नसतील तर आपलं जीवन कष्टप्रद होईल कारण सगळीच कामे आपण करू शकत नाही. त्यामुळे कष्ट करणा-या माणसाला त्याच्या कामाला कमी लेखू नये असे मला वाटते.

**क) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

१) कोष्टक पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| ग. दि. माडगूळकरांचा मूळ पिंड | → | कवीचा |
| ग. दि. माडगुळकरांनी रसिकांच्या मनावर घातलेली | → | मोहिनी |
| औंधच्या राजाने गदिमाना दिलेल्या सल्ला | → | सिनेमात जाण्याच्या |
| ग. दि. माडगुळकरांचे अजरामर काव्य | → | गीतरामायण |

२) एका वाक्यात उत्तरे लिहा.

अ) ग. दि. माडगुळकरांचे व्यक्तिमत्व बहुरंगी, बहुढंगी होते.

ब) साध्या शब्दात मोठा आशय पेळूतून सूत निघावे इतक्या सहजपणे शब्दात गुंफून सुरेल सुरात घोळून श्रोत्यांच्या मनीमानसी मुरवला गेल्याने गदिमा हे नाव विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात घराघरांत पोहोचले.

## विभाग २ – पद्य

**प्र. २ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१) आकृती पूर्ण करा.

'मनातले गाणे' असे म्हटल्यावर तुम्हाला सुचवणा-या कल्पना

| | | | |
|---|---|---|---|
| आईवडिलंविषयी कृतज्ञतेचे भाव | देशप्रेम, मातृभूमीचा अभिमान | गुरुजनांविषयी आदर | मित्रमैत्रीणीबद्दलचा जिव्हाळा |

२) कवितेतील संकल्पना आणि त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.

| कवितेतील संकल्पना | | संकल्पनेचा अर्थ |
|---|---|---|
| i) सारी खोटी नसतात नाणी | – | सगळे लोक फसवे नसतात. |
| ii) घट्ट मिटू नका ओठ | – | मनातील विचार व्यक्त करावेत. |
| iii) मूठ मिटून कशाला म्हणायचे भरलेली | – | भ्रामक खोट्या समजुती बाळगू नयेत. |
| iv) उघडून ओंजळीत घ्यावी मनातली तळी | – | मनातील सामर्थ्य व्यापक बनवावे. |

३) कवयित्री आसावरी काकडे यांनी 'खोद आणखी थोडेसे' या कवितेमध्ये माणसाने प्रयत्नवादी होऊन जगण्याची उमेद धरावी, असा उपदेश केला आहे. कवयित्री म्हणतात – घट्ट ओठ मिटून दुःख सोसत बसू नये. आपल्या मनात खोलवर एक गाणे लपलेले असते, ते शोधून काढायला हवे. हे समजावताना त्यांनी 'गळणा-या पानाचे'

प्रतीक वापरले आहे. शिशिरऋतूमध्ये पानगळ होते. झाड निष्पर्ण होते. परंतु जे पान सुकून, रिते होऊन झाडापासून विलग होते त्या पानात झाडावर असताना सोसलेल्या वेदना असतात. हे जन्माचे आर्त, आयुष्यात सोसलेल्या वेदना, त्या सुरुकुतलेल्या गळणा-या पानात सामावलेल्या असतात म्हणून पुन्हा वसंतात पालवी फुटण्याची उमेद ते बाळगुण असते. गळणा-या पानांमधून जीवन जगण्याची उमेद पुन्हा जागृत होते, हा आशावाद या ओळींतून व्यक्त झाला आहे.

४) प्रस्तुत कविता ही प्रतिकात्मक आहे. विहिरीचे किंवा झ-याचे प्रतीक वापरुन कवयित्रीने माणसातील एक अनमोल गुण हेरला आहे. आणि तो म्हणजे प्रत्येक माणसात काहीतरी नवीन निर्माण करण्याची क्षमता असते; ती ज्याची त्यालाच माहीत नसते, परंतु त्याने 'थोडेसे' चिंतन केले तो अंतमुर्ख झाला तर त्याला स्वतःमधील हा गुण लक्षात येईल आणि तो लक्षात आल्यावर माणसाने तो व्यक्त केला पाहिजे. त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली पाहिजे आणि जगात आपले नाव केले पाहिजे. त्यासाठी कवयित्री वरील पंक्तींतून एक उदाहरण देते. आपल्या मनात गाणे असते, पण आपण ते प्रकट करीत नाही. आपण आपले ओठ घट्ट मिटून घेतले आहेत; परंतु तसे न करता आपण 'मनातील गाणे' मुक्तकंठाने गायले पाहिजे, जगासमोर आणले पाहिजे.

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

**आश्वासक चित्र**

१) कवितेचे कवि / कवयित्री – नीरजा

२) कवितेचा रचनाप्रकार – मुक्त छंद

३) कवितेतून व्यक्त होणारा विचार – कवयित्री नीरजा भातुकलीच्या खेळातून स्त्री-पुरूष समानतेवर भाष्या करतात. स्त्रिया घर-दार, मुले-बाळे सांभाळून नोकरी-धंदा करतात. त्याच वेळी पुरुषाने त्यांना संसार सांभाळण्यासाठी बरोबरीने मदत केली पाहिजे आणि येणारी पिढी हळूहळू हे करते आहे. असा विचार व्यक्त करताना स्त्री-पुरूष समानतेचे मूल्य रुजविण्याचा प्रयत्न केला आहे.

**तू झालास मूक समाजाचा नायक**

१) कवितेचे कवि / कवयित्री – ज. वि. पवार

२) कवितेचा रचनाप्रकार – गद्यात्मक, निवेदनात्मक शैली

३) कवितेतून व्यक्त होणारा विचार – दलित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचारसरणीने केले. नवा आत्मविश्वास, लढण्याची प्रेरणा दिली मात्रा हा समाज आता थंड झाला आहे. अशी खंत या कवितेत कवीने व्यक्त केली आहे.

**क) रसग्रहण** –

प्रस्तुत काव्यपंक्ती संत रामदास स्वामी यांनी लिहिलेल्या 'उत्तमलक्षण' या अभंगातील असून या रचनेत आदर्श व्यक्तींची लक्षणे सांगितली आहेत. आदर्शत्वाची संकल्पना स्पष्ट करताना त्यांनी काय करावे आणि काय करू नये याबाबत मार्गदर्शन केले आहे. संत रामदास महाराज म्हणतात की, लोकांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करू नये. त्यांच्या विनंतीला मान द्यावा. स्वकष्टाची कमाई करावी. वाईट मार्गाने कधी ही पैसा गोळा करू नये. पाप मार्गाने मिळवलेला पैसा चांगला नसतो. चांगल्या मार्गाने संपत्ती जरूर मिळवावी. चांगल्या मार्गाने मिळवलेल्या संपत्तीचा आनंदाने उपभोग घेता येतो. काही झाले तरी सन्मार्ग सोडू नये. नेहमी चांगल्या मार्गाने जीवन जगावे. वाईट मार्गाला जाऊन वाईट मार्ग अनुसरल्यास त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. आपले आयुष्य मातीमोल होते

म्हणून पुण्यमार्गाने चालावे. चांगले काम करावे. सर्वांशी प्रेमाने वागावे. लोकांना दुःखात मदत करावी. लोकांची मते सत्कृत्य करुन जिंकावी.

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र. ३ कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) रेखाजींच्या कार्याचा परिणाम – श्रीमती रेखा यांनी आपल्या नोकरीकडे एक सामाजिक कार्य या दृष्टीने पहिले. या उदात्त दृष्टीकोनामूळे भरकटलेल्या मुलांकडे लक्ष गेले. वेगवेगळ्या कारणांनी मुले घराला दुरवतात. मुलांना वस्तुस्थिती कळत नाही. स्वतःला काय हवे एवढेच त्यांना कळते. त्यातून गैरसमज, ताणतणाव निर्माण होतात. भांडणे होतात. मुले रागावून निघून जातात. पत्ता चुकणे, सिनेमासारख्या झगमगत्या दुनियेच्या मागे लागणे, समाजकंटकांनी पळवून नेणे वैगेरे वैगेरे अनेक कारणांनी मुले घरापासून दूर जातात. स्वतःचे आयुष्य उद्ध्वस्त होतेच, पण त्यांचे कुटुंबही कोलमडून पडते. एकंदरीत ही गोष्ट सामाजिक स्वास्थ बिघडवणारी आहे. श्रीमती रेखा मिश्रा यांनी भरकटलेल्या ४३४ मुलांची सुटका केली आहे. पुन्हा त्यांना स्वतःच्या आनंदी व सुखरूप वातावरणात आणून सोडले. श्रीमती रेखा यांच्या प्रयत्नामुळे अनेक कुटुंबे सावरली आहेत. अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होण्यापासून वाचले आहेत. ज्यांचे बालपण कोळपले आहे, अशी मुले आनंदाने नाचूबागडू लागली आहे. श्रीमती रेखा यांच्या कार्यामुळे असे फार मोठे सामाजिक कार्य घडून आले आहे.

२) एखाद्या शाब्दाबद्दलचे कुतूहल शमवण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो. व्युत्पत्ती कोशात आपल्याला मूळ शब्द कसा, केव्हा, कुठे निर्माण झाला हे तर कळतेच परंतु अन्य भाषांत तो शब्द कसा आला आहे व कोणत्या रूपात आहे, हेही कळते. असा हा शब्दाचा किमयागार कसा अस्तित्वात आला हे समजून घेऊन उद्‌बोधक ठरेल. १९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षेतेखाली 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव या संमेलनात मंजूर करण्यात आला. क्रु. पां. कुलकर्णी यांच्यावर संपादनाची जबाबदारी सोपवण्यात आली. बॅ. मुकुंदराव जयकर यांनी अर्थसाहाय्य केले व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे निर्मितीस भरीव मदत केली. अखेर १९४६ साली मराठी व्युत्पत्ती कोशाचे पहिले प्रकाशन झाले.

३) कोणत्याही कलाकृतीचा, साहित्यकृतीचा, आनंद घेताना, आस्वाद घेताना आपल्याला सर्वप्रथम आपण जे पुस्तक वाचणार आहोत किंवा अभ्यास करणार आहोत ते साहित्याच्या कोणत्या प्रकारातील आहे म्हणजेच ते नाटक, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, काव्य यांपैकी कोणत्या प्रकारचे आहे त्याची माहिती असणे अतिशय आवश्यक आहे. त्यातून रेखाटलेली व्यक्तिचित्रे आणि त्यांच्या स्वभावातील भारावून टाकणारे विशेष आपण जाणून घेतले पाहिजे. ही व्यक्तिचित्रे सहजगत्या विकसित झाली आहेत की बारकावे वरवर कृत्रिमपणे टिपले आहे. पुस्तकातील कथांनाक आकर्षक व उत्कंठा वाढवणारी आहे काय याचा विचार केला पाहिजे. जर काव्य संग्रह असेल तर कवितांचे भावसौंदर्य, विचारसौंदर्य, अर्थसौंदर्य, रससौंदर्य कोणकोणत्या गोष्टीतून जाणवते, लेखकाची भाषाशैली कशी आहे, तसेच पुस्तकाचा, विषयाचा आरंभ व शेवट आकर्षक पद्धतीने केला आहे काय या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत. सर्वात महत्वाचे म्हणजे पुस्तकातून मिळणारे चिरंतन मूल्य, संदेश, उपदेश तसेच कथानक व त्यातील आशय व कथानकाचा विषय या सर्वांच्या मनावर एकत्रित परिणाम होतो की नाही याचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र. ४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती**

**१) समास** –

| समास | अव्ययी भाव | वैकल्पिक द्वंद्व | समाहार द्वंद्व | विभक्ती तत्पुरूष |
|---|---|---|---|---|
| समासिक शब्द | पानोपानी | चारपाच | येणेजाणे | लोकप्रिय |

**२) शब्दसिद्धी.**

अ) 'अनिय' हा प्रत्यय लावून तयार होणारे दोन शब्द लिहा – i) अनाकलनीय ii) माननीय iii) सन्माननीय

ब) 'अति' हा उपसर्ग लावून तयार होणारे दोन शब्द लिहा – i) अतिशहाणा ii) अतिउत्तम

**३) वाक्प्रचार – पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i) निष्कासित करणे – बहिष्कार टाकणे.

वाक्य – शाळेला अनेक दिवस दांडी मारल्यामुळे मुख्याध्यापकांनी प्रसादला शाळेतून निष्कासित केले.

ii) हुक्की येणे – लहर येणे.

वाक्य – राजूला मधूनच गाणी म्हणायची हुक्की येते.

iii) व्यथित होणे – दुःखी होणे.

वाक्य – कमी मार्क मिळाल्यामुळे साहिल खूप व्यथित झाला.

iv) मुग्ध होणे – रममाण होणे.

वाक्य – पावसाळ्यातील महाबळेश्वरचे निसर्ग सौंदर्य आम्ही मुग्ध होऊन पाहत राहिलो.

**आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**१) शब्दसंपत्ती.**

i) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.

अ) केलेल्या उपकाराची जाणीव – कृतज्ञता ब) देवाचे अस्तित्व न मानणारा – नास्तिक

ii) समानार्थी शब्द लिहा.

अ) नवल = आश्चर्य, विस्मय. ब) पाणी = जल, नीर.

ii) विरुद्धार्थी शब्द लिहा.

अ) अपमान x मान ब) नियमित x अनियमित

**२) लेखननियमांनुसार लेखन.**

अचूक शब्द ओळखा.

i) उज्वल ii) आश्चर्य iii) बाष्कळ iv) प्रस्तुत

**३) विरामचिन्हे.** - प्रस्तुत वाक्यात विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.

"तू सावित्री हो!" या पुस्तकात एकूण आठ कथा आहेत.

**४) पारिभाषिक शब्द** – खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा.

अ) Luck – भाग्य ब) Death Zone – मृत्यूचा टप्पा

**विभाग – ५ उपयोजित लेखन**

**प्र.५** **अ**) पुढील दोनपैकी कोणतीही एक कृती सोडवा.

१) खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा.

दि. १८ जाने. २०२२

प्रति,

मा. व्यवस्थापक (शहर विभाग),

म. राज्य परिवहन महामंडळ, सातारा ४२१०१२

विषय – राजवाडा ते एस टी स्टँड नियमित बस सुरू करण्याबाबत.

महोदय,

मी शुभम कुलकर्णी, राहणार – सोमवार पेठ, सातारा आपणास विनंती करतो, की राजवाडा ते एस टी स्टँड ही स्वतंत्र बससेवा सुरू करण्यात यावी. कारण राजवाडा हे तसे मोठे क्षेत्र असून, राहिवाशांची संख्याही तेथे अधिक आहे. अनियमित बससेवेमुळे येथील लोकांची गैरसोय होते. विनाकारण ऑटो रिक्षांना अधिक पैसे द्यावे लागतात. यामुळे सामान्य, गरीब माणसांना अधिक झळ सोसावी लागते. गेल्याच महिन्यात याविषयी एक पत्र पाठविले होते. तेव्हा यासंबंधी आपण लवकरात लवकर निर्णय घेऊन बसची सोय करवी, ही विनंती, कळावे.

आपला विश्वासू,

शुभम कुलकर्णी

२) दिलेला उतारा वाचून त्याचा एक तृतियांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

हत्यारे साधनमात्र असतात, ती कितीही तीक्ष्ण, कार्यक्षम असली तरी ते साधनच. साधन वापरणारे हात मजबूत असले पाहिजेत त्याचबरोबर हातांना प्रेरित करणारे हृदयही सबळ असले पाहिजे. विरतेचे आश्रयस्थान म्हणजेच हृदय. त्याचा विकास होणे म्हणजेच मनोबलाचा विकास होणे आवश्यक आहे.

**आ**) **पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) **जाहिरातलेखन** – **दिलेली जाहिरात वाचून कृती सोडवा.**

**i**) आकृतीबंध पूर्ण करा – i) कपाट. ii) ड्रेसिंग टेबल. iii) डायनिंग टेबल. iv) दिवाण सेट.

**ii**) आकृतीबंध पूर्ण करा – i) टेबल. ii) खुर्च्या. iii) कपाटे. iv) बाक.

**iii**) वर्धापन दिनानिमित्त खरेदीवर ५ ते १०% सवलत मिळणार आहे.

२) **कथालेखन** – दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे काथालेखन करा. योग्य शीर्षक द्या.

दोघांचे भांडण तिस-याचा लाभ

एका गावात दोन मांजरी राहत होत्या. नेहमी त्या एकत्रच असायच्या. जवळच एक आजीबाई राहत होत्या. त्यांनी गाई-म्हशी पाळल्या होत्या. रोज दूध काढून दुधाचे लोणी करून त्या बाजारात नेऊन विकायच्या. एकदा असेच त्यांनी लोणी काढून ठेवले होते आणि त्या गाई-म्हशींना चारा घालण्यासाठी गेल्या. मांजरी लोण्यावर लक्ष ठेवूनच होत्या. आजीबाई बाहेर पडताच त्यांची नजर चुकवून मांजरींनी घरात प्रवेश केला आणि लोण्याचा गोळा उचलून एका झाडाखाली जाऊन बसल्या.

लोण्याच्या गोळयाची वाटणी करण्यावरून त्यांच्यामध्ये भांडण सुरू झाले. झाडावर बसलेले माकड त्या दोघींचे सुरू असलेले भांडण बघत होते. माकड हळूच झाडावरून उतरून मांजरींजवळ आले आणि म्हणाले, “मी

तुम्हाला लोण्याची समान वाटणी करून देतो." माकडाने एक तराजू आणला. लोण्याचा थोडा भाग एका पारड्यात ठेवला. ज्या पारड्यात लोणी जास्त होते त्यातले थोडे त्याने मटकावले. असे करत करत हळूहळू लोण्याचा बराचसा भाग माकडाने खाऊन टाकला. उरलेला थोडा भागही पारडे कमी जास्त होते म्हणून खाऊन टाकला आणि पळून गेले. बिचा-या दोन्ही मांजरी उपाशीच राहिल्या. अशाप्रकारे भांडणामुळे त्यांचेच नुकसान झाले.
तात्पर्य – दोघांचे भांडण तिस-याचा लाभ.

**इ) खालीलपैकी एक कृती सोडवा.**

२) **प्रसंगलेखन** –

रम्य सकाळ / प्रसन्न सूर्योदय

वरवर जायचे असेल तर शिक्षणाची एकेक पायरी दमदारपणे व आत्मविश्वासाने ओलांडावी लागते. मी नववीची पायरी ओलांडली आणि दहावीत दाखल झाले. उत्तम गुण मिळाल्याचे समजले अन् जीव भांड्यात पडला. अर्धी लढाई जिंकली एकदाची! आता निदान आठवडाभर तरी टेकडीवर पहाटे फिरायला जायचे, ताजेतवाने व्हायचे नी मग नव्या जोमाने आभ्यासाला लागायचे असे ठरवून दुस-या दिवशी भल्या पहाटे उठून फिरायला गेले.

टेकडी चढताना हवेत गारवा जाणवला. वसंत ऋतूमुळे झाडांना नुकतीच पालवी फुटू लागली होती. गुलमोहर फुलले होते. बोगनवेलीसुद्धा नटल्या होत्या. रखरखीत उन्हाळ्यातसुद्धा सृष्टी रंगीबेरंगी दिसत होती. आसमंतात मंद सुगंध पसरला होता. पावशा आणि कोकिळा तानावर ताना घेऊ लागल्या आणि त्याचवेळी ........... काय आश्चर्य!

पूर्वक्षितिजावर गुलाल मुठींची उधळण सुरू झालेली दिसली. त्यांच्या तळापासून लालिमावर झेपावू लागला. लालसरपणाची अनेक रूपे, त्याचे लाघव डोळ्यांत साठवून घेत असतानाच, कोवळ्या सुवर्णछटांची नक्षी लालबुंद गालिच्यावर रेखली जाऊ लागली..... सुवर्ण झळाळी आपल्या अंगाअंगावर माखून घेतली. अशा या सप्तरंगी वातावरणात सप्त अश्वांच्या रथातून सूर्यनारायणाचे आगमन झाले. मी भान हरपून ते मनोहारी दृश्य बघत राहिले. प्रसन्न ताजेपणाचा सडा सगळ्या वातावरणात शिंपला गेला.

पक्ष्यांचा किलबिलाट वाढला, त्यामुळे झाडांचे अस्तित्व ठळक होऊ लागले. फुलं उमलावीत तशी पक्ष्यांची गाणी बहरू लागली. उमलत्या फुलांचे निरागस हसू रिमझिम सरींसारखे भूरभुरू लागले. वा-याचे बोट धरून झाडे, वेली, फुले यांनी नृत्य सुरू केले.

इकडे आबालवृद्धांचा टेकडीवर पायरव सुरू झाला. उत्साही मंडळी म्हणे भल्या पहाटेच अंधारातच चालू लागतात. त्यांच्या पायांना सराव झाल्यामुळे धडपडून पडण्याची शक्यता कमीच. शाळा-कॉलेजला सुट्टी लागताच बाळगोपाळांची टेकडीवर जत्राच भरते, व त्यांच्या चिवचिवटाने वातावरण उल्हासित होते. तसं नवं वर्ष लागताच फिरण्याचे 'संकल्प' करणारे आरंभशूर काही कमी नसतात.

मग ते पावसाळ्यातल्या भुछत्रांच्या छत्र्यांप्रमाणे टेकडीवर टोळ्याटोळ्यांनी दिसतात; पण लवकरच त्यांचा उत्साह संपतो व ते दिसेनासे होतात. तसा माझाही संकल्प आठवड्यापुरताच अहे. चिवट मंडळी मात्र नियमितपणे येतात. आज टेकडीवर मला खूप माणसं दिसली व माझा उत्साह द्विगुणीत झाला.

मी तोच उत्साह, ताजेपणा घरी घेऊन आले आणि फ्रेश होऊन मराठीचे पुस्तक वाचण्यासाठी हातात घेतले.